**प्रेस नोट** **दि.२०/०३/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

**भिवंडी पो.स्टे.गु.र.नं.३८७/२०१८ भा.दं.वि.क.३६३ मधील अल्पवयीन मुलीचा शोध घेणेसाठी मदत करून अपहृत अल्पवयीन मुलीचा व आरोपीचा शोध घेऊन भिवंडी पोलीसांचे ताब्यात देणेकामी मदत केलेबाबत.**

---

भिवंडी पो.स्टे.ठाणे गुन्हा रजि.नं. ३८७/२०१८ भा.दं.वि.क. ३६३ मधील अपहृत अल्पवयीन मुलीस संशयित आरोपी- समीर इर्शाद अन्सारी, वय २६ वर्षे, रा. सना अपार्टमेंट, जकरीया बिल्डींग, ४ था मजला, अपना हॉस्पिटलजवळ, भिवंडी, जि. ठाणे यांने दि.२६/१२/२०१८ रोजी भिवंडी येथून घेऊन तिचे अपहरण केले होते. त्याचे मोबाईल नंबरचे टॉवर लोकेशन हे येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील आल्याने, शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी चे पो.उप.निरी. उदय आर्दाळकर हे त्यांचे स्टाफसह अपहृत मुलगी व आरोपीचे शोधासाठी दि.१८/०३/२०१९ रोजी येरवडा पो.स्टे.येथे आले होते. त्यांनी येरवडा पो.स्टे.येथे येऊन, पोलीस मदतीची मागणी केल्याने, त्यांचे मदतीस येरवडा पो.स्टे.कडील तपास पथकाचे पो.शि. ७३३५ सुनिल नागलोत व पो.शि. १०५८० समीर भोरडे यांना देण्यात आले होते.

सदर पोलीस कर्मचारी बाहेरील जिल्ह्यातून तपासकामी आलेल्या वरील पथकास योग्य ती मदत करून, सदर संशयित आरोपी व अपहृत अल्पवयीन मुलीबाबत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील कामराजनगर भागात गोपनीयरित्या माहिती काढून, त्यांचा शोध घेऊन, अपहृत अल्पवयीन मुलीस व वरील नमूद आरोपीस वरील पोलीस पथकाचे ताब्यात देण्यास मदत केली आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील तपास पथकाचे पो.शि. ७३३५ सुनिल नागलोत व पो.शि. १०५८० समीर भोरडे यांनी बाहेरील जिल्ह्यातून तपासकामी आलेल्या पोलीस पथकास, गुन्ह्यातील अपहृत मुलीचा व संशयित आरोपीचा शोध घेवून त्यांचे ताब्यात देण्यासाठी योग्य ती मदत करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**(राजेंद्र कदम)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन,पुणे